# पालखेड धरण, ता. दिंडोरी, जि. नाशिक



नाशिक शहराला खूप मोठा भौगोलिक व सांस्कृतिक वारसा प्राप्त आहे. त्यात अजून भर टाकण्याचे काम येथील नद्यांनी व त्यावरील धरणांनी केलेले आहे, त्यातील एक धरण म्हणजे पालखेड धरण . हे महाराष्ट्रतील नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील कादवा नदीवर वसलेले एक महत्वूर्ण धरण आहे.

- पालखेड धरणाचे बांधकाम सन १९७६ मध्ये करण्यात आले , पालखेड हा सिंचनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा प्रकल्प आहे त्यावर डावा कालवा येवला अंदरसुल पर्यंत १२८ कि.मी. व उजवा कालवा २० कि.मी. मिळून ४४००० हेक्टर शेती क्षेत्र ओलिताखाली आणले जाते .
- हे धरण आजूबाजूच्या गावं तालुक्यामध्ये सिंचन, औद्योगिक, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था(DRDO) आणि घरगुती वापरासाठी पाण्याचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे.
- या धरणाचा आजूबाजूचा परिसर निसर्गरम्य आणि शांत वातावरणासाठी ओळखले जाते, व धरणाच्या आजूबाजूच्या क्षेत्रात विविध प्रकारच्या फुलांची शेती केली जाते, ज्यांचा आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे.
- 4) पालखेड धरणापासून जवळच तीन किलोमीटर अंतरावर सह्याद्री फार्म्स ही फार्मर्स प्रोड्युसर कंपनी सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठही उपलब्ध करून देते. या अभिनव आणि यशस्वी प्रकल्पाचा अभ्यासही करण्यासाठी जगभरातून पर्यटकांची वर्दळ असते.

- 5) **पावसाळा व हिवाळा या दोन ऋतूंमध्ये या प्रदेशाचे नैसर्गिक सौंदर्य अजूनच मनमोहक आणि रमणीय असते, म्हणून पालखेड धरण व आजूबाजूचा परिसराला भेट देण्याची सर्वोत्तम वेळ बनवते व शांत स्थानामुळे ते कुटुंब आणि मित्रांसह पिकनिक साठी पसंतीचे स्थळ आहे.**
- 6) **अगदी जवळच असलेला नाशिक- सापुतारा रस्ता आणि विमानतळ या पर्यटन स्थळी पोहोचण्यासाठी व अभ्यासपूर्ण पर्यटन करण्यासाठी पर्यटकांना आकर्षित करते...!**